# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : *coegondwana@gmail.com*


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./2607/२०१९ — दिनांक :31 /०७/२०१९

## परीपत्रक

(नामांकन सत्र २०१९–२०)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१९–२० च्या प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही सुरू झालेली असून महाविद्यालयांना नामांकनाच्या **Online** प्रक्रिया संदर्भात खालील प्रमाणे महत्वपुर्ण सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) महाविद्यालयामध्ये दिनांक ०५/०८/२०१९ पर्यंत **Online** झालेले सर्व विद्यार्थ्याचे प्रवेश विद्यापीठाला **Online Submit to Registration (Data Upload)** करून विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

२) विद्या विभागाव्दारे जाहीर केलेल्या परीपत्रक गो.वि.ग./विद्या/शिशु/२२६/२०१९, दिनांक १३/०५/२०१९ नुसार प्रति विद्यार्थी रू. १२५/–प्रमाणे नामांकन शुल्क घेण्यात यावे. नामांकन शुल्काचे कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेचे धनाकर्ष **(D.D.)** हा "वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली" यांचे नावे देय असावा व सदर धनाकर्ष दि. १९ ऑगस्ट २०१९ पर्यंत विद्यापीठाकडे जमा करावा.

३) विद्यापीठात नामांकन आवेदनपत्र सादर करतेवेळी महाविद्यालयाने खालील प्रमाणे कागदपत्रे जोडणे अनिवार्य राहील.

**i)** नियमित/ कार्यकारी प्राचार्य मान्यता पत्र अथवा संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना स्वाक्षरीचे अधिकार प्रदान केले असल्याचे पत्र/स्वाक्षरी नमुना.

**ii)** वित्त विभागाचे ना देय प्रमाणपत्र

**iii)** विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण पत्र

**iv)** ज्या शैक्षणिक वर्षाचे फॉर्म स्विकाराचे आहे त्या वर्षाचे संलग्निकरण प्रमाणपत्र.

**v)** अभ्यासक्रमाला शासनाने दिलेले मान्यता पत्र.

**vi)** महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे प्रमाणपत्र.
ज्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेश घेतलेले आहेत त्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेश क्षमतेचे मंजुरीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**vii)** नामांकन आवेदन पत्रासोबत विद्यार्थ्याचे **Eligibility Status Report** जोडणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयाने नामांकन करीत असतांना सदर माहीती **Form A, B & Form E, F** मध्ये सादर करावी. ही सर्व प्रपत्रे **www.unigug.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सोबत **Soft Copy(CD)** देण्यात यावी.

५) विद्यार्थ्याचे नामांकन हे नियोजित वेळेतच झाले पाहिजे. ज्या विद्यार्थ्याचे नामांकन होणार नाही, त्या विद्यार्थ्याचे परीक्षेचे आवेदन पत्र उपलब्ध होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६) महाविद्यालयाने विद्यार्थ्याचे प्रवेश देतांना त्या विद्यार्थ्यांची सदर अभ्यासक्रमासाठी असलेली आवश्यक शैक्षणिक पात्रता तपासूनच विद्यापीठाच्या निदेशानुसारच प्रवेश द्यावा. अपात्र असलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिल्यास विद्यापीठाद्वारे कधीही त्यांचे नामांकन रद्द केले जाईल व याची सर्वस्वी जबाबदारी ही त्या संबंधीत महाविद्यालयाची राहील.

७) ज्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द (**Admission Cancel**) करावयाचे असेल त्यांनी आपल्या महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्याच्या स्वाक्षरीसह त्या विद्यार्थ्यांचे नाव, अभ्यासक्रम, सेमीस्टर व **Online Eligibility No.** लिहून विद्यापीठात सादर करून तात्काळ प्रवेश रद्द करावे.

८) बाहेरील विद्यापीठाच्या/ बोर्डच्या विद्यार्थ्यांचे नामांकन करतेवळी सदर विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्र घेवूनच प्रवेश निश्चित करावा. तसेच गो.वि.ग/विद्या/शिशु/२२६/२०१९, दि. १३/०५/२०१९ नुसार कार्यवाही घेवून **Immigration** (प्रवजन) शुल्क व्यावसायीक अभ्यासक्रमाकरिता रू. २००/– व अव्यावसायीक अभ्यासक्रमाकरिता रू. १००/– भरणे आवश्यक आहे.

९) नामांकन आवेदनपत्र व संलग्नित कागदपत्रे हे बॉक्स फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे. आणि मुळ गुणपत्रिका व ईतर प्रमाणपत्र वेगळया फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे.

१०) ज्या विद्याशाखेकरीता नियमित मान्यता प्राप्त एकही प्राध्यापक महाविद्यालयात नाही अशा महाविद्यालयातील संबंधीत अभ्यासक्रम/विद्याशाखेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश क्षमतेच्या २०% प्रवेश कमी करून नामांकन करण्यात येईल करिता अशा महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

११) महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन करतांना स्थलांतरण प्रमाणपत्र (**Migration Certificate**) व योग्यता प्रमाणपत्र (**Eligibility Certificate**) विद्यापीठात सादर करणे अनिवार्य आहे.

१२) जे महाविद्यालय संबंधित विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र (**Migration Certificate**) विद्यापीठात सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्यात येणार नाही.

31/7/2019

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२. मा. प्र–कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
५. मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित सर्व महाविद्यालय.
६. उपकुलसचिव, परीक्षा पुर्व/उपरांत, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
७. उपकुलसचिव,महाविद्यालयीन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
८. संगणक विभाग प्रमुख,सदर परीपत्रक व प्रपत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.